येते. जुन २०१७ मध्ये हा खरेदीचा निर्देशांक ५०.९ इतका होता. जुलै २०१७ मध्ये त्यात घट होईल तो ४७.९ इतका झाला. गेल्या नऊ वर्षातील ती कमाल निचांकी पातळी आहे. बाजारपेठेत खरेदीत घट होण्याचे तात्कालीक कारण म्हणजे वस्तु व सेवाकर अमलात येणे हे आहे.

लहान उद्योगांवर वस्तु व सेवाकराचा दीर्घकालीन नकारात्मक परिणाम पडू शकतो. या करामुळे कागदी घोडे जास्त प्रमाणात नाचवावे लागल्यामुळे हा परिणाम पडणार आहे. या करानुसार लहान उद्योगांना दरमहा रिटर्न भरावे लागणार आहे. या मासिक रिटर्नमध्ये महिन्यातून तीन वेळा ऑनलाईन सुचना द्याव्या लागतील. त्यामुळे प्रत्यक्ष व्यवहारात दरमहा तीनदा या प्रमाणे वर्षभरात ३६ वेळा रिटर्न भरावे लागणार आहे. लहान उद्योगांना ही बाब अडचणीची ठरेल. लहान व्यावसायिकांवर वस्तु आणि सेवाकरांचे आणखी दुष्परिणाम दिसून येतील. जुन्या व्यवस्थेत आंतरराज्यीय व्यवहार सुलभ नव्हते. नव्या कर प्रणालीमुळे असे व्यवहार सुलभ होणार आहे. ग्रामीण भागात शहरी अवजारे सहज उपलब्ध होऊ लागल्याने ग्रामीण भागातील लोहार काम करणाऱ्या लोहारांच्या धंद्याचे नुकसान होणार आहे. शहरातून प्लॅस्टीकचे घडे खेडेगावात मिळू लागल्याने खेड्यातील कुंभारचे मातीचे घडे विकत घेणे बंद होईल. त्याचा परिणाम त्यांच्या व्यवसायावर होईल. वस्तु आणि सेवाकरांमुळे लहान उद्योगांचे नुकसान होणार असून मोठ्या उद्योगांना मात्र फायदा होणार आहे. एकुणच अर्थव्यवस्थेवर वस्तु आणि सेवाकरांचा वाईट परिणाम होण्याची शक्यता आहे.

वस्तु व सेवाकर मंजुर झाल्यानंतर याचा परिणाम काही क्षेत्रावर प्रतिकुल झाला. आयटी कंपन्यां अनेक ठिकाणच्या केंद्रावरून पुरविल्या जाणाऱ्या सेवांसाठी वेगळा करार करावा लागेल. उत्पादित वस्तुंवरील कर सध्या १४–१५ टक्के आहे. वस्तु आणि सेवाकर लागल्यावर तो फार वाढुन १८ टक्क्यांवर जाणार असल्याने इलेक्ट्रॉनिक वस्तु मोबाईल फोन ते लॅपटॉप सारेच महाग होईल. सुवर्ण बाजारावर सुध्दा वस्तु व सेवाकरांचा विपरित परिणाम दिसून आला. वस्तु व सेवाकरांमुळे सोन्यावरील कर तीन पट वाढल्याने सुवर्ण व्यवसायात असलेली मंदीत आणखी भर पडली आहे. वस्तु व सेवाकर लावण्यासाठी सोन्यावर १.२ टक्के मुल्यवर्धित कर लागत होता. वस्तु व सेवाकर लागु झाल्यानंतर सोन्यावरील कर जवळपास तीनपट वाढुन आता ३ टक्के वस्तु व सेवाकर लागत आहे. चालू भावाप्रमाणे पूर्वी एक तोळ्यामागे साधारण ३०० रूपये मोजावे लागायचा, आता ८५० ते ९०० रूपये मोजावे लागत आहेत. वस्तु व सेवाकरामुळे रेल्वे, एसटी प्रवास भाड्यात वाढ होईल. वातानुकुलित प्रवास करणाऱ्या प्रवाशांना आजतागायत एकुण भाड्याच्या ३० टक्के रकमेवर १४.५ टक्के कर भरावा लागत होता. ही रक्कम प्रवास भाड्याच्या साधारण ४.५ टक्के होती. वस्तु व सेवाकर लागु झाल्यानंतर आता रेल्वे प्रवासासाठी एकुण प्रवास भाड्यावर सरसकट ५ टक्के वस्तु व सेवाकर आकारला जाणार आहे. त्यामुळे सध्यापेक्षा आणखी अर्धा टक्का रक्कम वाढणार आहे.

एकुणच वस्तु व सेवाकरामुळे लहान उद्योग प्रभावित होणार आहेत. अर्थव्यवस्थेचे संतुलन कायम राहण्यासाठी मागणी व पुरवठा यांच्यातील संतुलनही कायम राहावे लागेल. गाडीच्या चाकातील हवा काढून टाकल्यावर गाडीचे पॉवर स्टिअरिंग जसे निरूपयोगी ठरते तसेच भारताच्या अर्थव्यवस्थेबाबत होणे अपेक्षित आहे. अमेरिकेत विसाव्या दशकात जे आर्थिक डिप्रेशन आले होते ते वस्तु व सेवाकरामुळे आले होते. शेअर बाजारात तेजी होती. कारण मोठ्या व्यावसायिकांकडून खरेदी होत होती. परंतु मागणी कमी झाल्याने अर्थव्यवस्था संकटात सापडली होती. कार्ल मार्क्स यांनी याच संकटाकडे लक्ष वेधताना म्हटले होते. भांडवदरारांकडून नेहमी कर्मचाऱ्यांच्या वेतनात कपात करण्याचे प्रयत्न होत असतात. पण त्यामुळे बाजारात मागणी कमी होते याचा कुणी विचारच करीत नाही. वस्तु व सेवाकरामुळे आपल्या देशावर भविष्यात याच तऱ्हेचे संकट ओढणार आहेत. एकीकडे शेअर्सच्या निर्देशांकांत वाढ होत आहे. पण विकास दर मात्र कमी होत आहे. वस्तु

Scanned with CamScanner

व सेवाकरामुळे विकासदर दीर्घकाळापर्यंत कमी राहील असे अनुमान आहे.

निष्कर्ष :—

वस्तु व सेवाकरामुळे १७ वेगवेगळे कर आणि २६ उपकर बंद झालेत. वस्तु व सेवाकरामुळे सोन्याच्या व्यवसायात मंदी निर्माण झाली. वस्तु व सेवाकराचा जास्तीत जास्त परिणाम ग्राहक वर्गानाच सोसावा लागत आहे. वस्तु व सेवाकरामुळे उद्योग धंद्यात मंदीची परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे त्याचा परिणाम देशामधील बेरोजगाराच्या संख्येमध्ये वाढ झाली. कापसाच्या सुतावर ५ टक्के, कृत्रीम धागाच्या सुतावर १४ टक्के आणि सेवाकर ५ टक्के असा एकुण वेगवेगळ्या पध्दतीने ३३ टक्के पर्यंत कर लागला. त्यामुळे विदेशातील तयार झालेल्या कापडाशी स्पर्धा करता येणार नाही. वस्तु व सेवाकरामुळे मोठ्या उद्योगांना फायदा होईल परंतु लहान उद्योगांना नुकसान सहन करावे लागेल त्यामुळे देशात भांडवलशाहीला उत्तेजन मिळेल.

संदर्भसुची :—

१) लोकमत वृत्तपत्र दि.२६ जानेवारी २०१७ ॲड. विद्याधर आपटे

२) लोकमत वृत्तपत्र दि. १२ जानेवारी २०१७ श्री. अरूण जेधाली

३) लोकमत वृत्तपत्र दि. १७ ऑगस्ट२०१७ डॉ. भारत झुनझुनवाला

४) App. India GST.

❑❑❑

29

सामान्य व्यक्ती व प्रमुख क्षेत्रावर जी.एस.टी.चा परिरणाम

विनायक विष्णुपंत खांडेकर

सहाय्यक प्राध्यापक, (वाणिज्य) भारतीय महाविद्यालय, मोशी

****

प्रस्तावना :

भारत सरकारने विकासाच्या दृष्टीने घेतलेला महत्वपूर्ण निर्णय म्हणजे जी.एस.टी. होय. या निर्णयामुळे सामान्य नागरीकांच्या जीवनामध्ये अमुलाग्र बदल घडुन येवू शकतो. या दृष्टीकोनातुन एक देश एक कर ही घोषणा करण्यात आली जी.एस.टी. कराचे स्लॅब ० टक्के, १२ टक्के, १८ टक्के आणि २८ टक्के असे पाच टप्पे करण्यात आले.

भारतामध्ये अनेक कायदे असतांना जी.एस.टी. नावाच्या आणखी एका कायद्याची खरच गरज होती काय? यासाठी आपण करप्रणालीबद्दल थोडासा विचार करु, कर हा दोन प्रकारे लावला जातो. १) प्रत्यक्ष कर २) अप्रत्यक्ष कर

प्रत्यक्ष कर म्हणजे आयकर, वेल्थटॅक्स, गिफ्ट टॅक्स म्हणजेच जी व्यक्ती उत्पन्न कमावते त्या व्यक्तिस भरावा लागणारा कर, परंतु अप्रत्यक्ष म्हणजे उत्पादन, विक्री खरेदी सेवा पुरवठ्यावर लागणारा कर जो व्यापारी भरतो, परंतु त्याचा बोजा मात्र ग्राहकावरती लादला जातो. भारतामध्ये या आधी अप्रत्यक्ष कर म्हणुन विक्रीकर किंवा मूल्यवर्धीत कर, उत्पादन शुल्क, सेवाकर, करमणुक कर, जकात कर/LBT असे अनेक वेगवेगळे कर लादले जात होते. ह्या कराचा बोजा शेवटी ग्राहकावर पडत असतो. आताची कर रचना ही विविध स्तराची असुन त्यात राज्य व केंद्राचे कर आहेत. त्यामुळे करावर कर असा परीणाम होत जातो. या कराचे दर भिन्न आहेत. विविध ठिकाणी ते वसूल केले जातात. केंद्राचे प्राप्तीकर, सेवाकर, केंद्रीय विक्रीकर, अबकारी कर, सुरक्षा उलाढाल कर असे कर आहेत. राज्याचे व्हॅट व विक्रीकर, जकात कर, राज्य अबकारी कर, मालमत्ता कर, प्रवेश कर, कृषी कर असे कर आहेत. भारतीय उत्पादनावर कराचे ओझे वाढवून देशात व परदेशात वसतुच्या किमती वाढतात. यावर उपाय म्हणुन घटनात्मक सुधारणा विधेयक जी.एस.टी. हे आपल्या भारत देशाने १३ एप्रिल २०१७ ला पारीत केले आणि १ जुले २०१७

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

|| Index ||

01) Promoting Entrepreneurship in the emerging educational scenario || 21
Dr. Atul R. Sidurkar, Wardha

02) ROLE OF WOMEN ENTREPRENEURS IN 21st CENTURY INDIA: ..... || 25
Dr. Madhuri K. Tanurkar

03) Effects of Sports In Personality Development ||30
Dr. N. N. Jangitwar, Ashlesha Nagpure (Ingole)

04) Reading Habits of Lecturers and Role of Libraries || 32
Dr. Vijay M. Deshmukh

05) Concentration of Calcium Present In Pond Water Sample of Nipani Town || 35
YASHODHARA VARALE

06) Knowledge Management In academic Libraries || 37
Dr. Sunil H. Urkudkar

07) Recent Trends in Agriculture || 40
Mr. Prashant S. Vairalkar

08) Low Cost Agrowaste Adsorbents for the Removal of Zinc and ..... || 45
Rashmi R. Sharma, Shankar R. Warhate

09) Comparative Assessment of Physicochemical Parameters of ..... || 49
V. S. Jagtap

10) SEM BASED POLLEN MORPHOLOGICAL STUDIES IN SOME GENERA ..... || 53
A. V. Rajurkar, J. A Tidke, R. S. Matte

11) Life History of Papilio polytes romulus the Common Mormorn ..... || 56
Om Datta, Saharanpur

12) Globalization and its Impact of India || 62
Dr.Nandkishor N. Dhondge

13) THE ROLE OF ICT IN TEACHING SCIENCE AND HIGHER EDUCATION || 64
Dr. Manju H. Pardeshi

Scanned with CamScanner

14) Woman in 21 Century
Prof. Kanchan Ingole || 68

15) A STUDY OF CHANGING GLOBAL ENVIRONMENT
Jayshree. P. Morey || 70

16) INDIA IN THE GLOBAL ECONOMY
Dr. KISHOR M. GOMEKAR || 72

17) Globalization and Indian Agriculture
Mr. Miliand H.Dhale, Ghatanji || 76

18) GLOBAL ECONOMIC CRISIS AND ITS IMPACT ON INDIA
Tathagat P. Gajbhiye || 79

19) जागतिकीकरणाचा भारतीय ग्रामीण समाजावर पडलेला परिणाम
डॉ. अरविंद वि. जोशी, || 83

20) एकविसाव्या शतकतील स्त्री
DEEPA RUPLAL METKAR || 84

21) ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्यविषयक समस्या
प्रा. डॉ. सरिता देशमुख || 86

22) जागतीकीकरणामध्ये भारतीय समाजातील स्त्रियांची बदलती स्थिती
डॉ. विशाखा जगन्नाथ डेरे, प्रा. किसन खाडे || 90

23) अंकीय (Digital) ग्रंथालयाची शैक्षणिक उपयुक्तता
डॉ. अल्फा के. जैन, दिग्रस || 94

24) ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील नविन प्रवाह
कु. शारदा लांजेकर, डॉ. अनिल भोयर, || 98

25) जागतीक पर्यावरणीय समस्या व कार्यरत आंतरराष्ट्रीय संस्था
RAVINDRA GOVINDRAO BAWANE || 102

26) "जागतिकीकरण आणि ग्रामीण स्त्री:ऐतिहासिक अध्ययन"
संदिप व्ही. भुरले || 104

27) भारतासंदर्भात जागतिकीकरणाचे गुण-दोष
डॉ. सुनिल श्री. केधर, || 107

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

Scanned with CamScanner

VOL-02

Special Issue March 2018

Vidyawarta®

International Multilingual Research Journal

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Chief Editor
Prof. Virag Gawande

Published By
Aadhar Social Research Development Training Institute, Amravati.

Scanned with CamScanner

|| Index ||

01) Promoting Entrepreneurship in the emerging educational scenario
Dr. Atul R. Sidurkar, Wardha || 21

02) ROLE OF WOMEN ENTREPRENEURS IN 21st CENTURY INDIA: .....
Dr. Madhuri K. Tanurkar || 25

03) Effects of Sports In Personality Development
Dr. N. N. Jangitwar, Ashlesha Nagpure (Ingole) ||30

04) Reading Habits of Lecturers and Role of Libraries
Dr. Vijay M. Deshmukh || 32

05) Concentration of Calcium Present In Pond Water Sample of Nipani Town
YASHODHARA VARALE || 35

06) Knowledge Management In academic Libraries
Dr. Sunil H. Urkudkar || 37

07) Recent Trends in Agriculture
Mr. Prashant S. Vairalkar || 40

08) Low Cost Agrowaste Adsorbents for the Removal of Zinc and .....
Rashmi R. Sharma, Shankar R. Warhate || 45

09) Comparative Assessment of Physicochemical Parameters of .....
V. S. Jagtap || 49

10) SEM BASED POLLEN MORPHOLOGICAL STUDIES IN SOME GENERA .....
A. V. Rajurkar, J. A Tidke, R. S. Matte || 53

11) Life History of Papilio polytes romulus the Common Mormorn .....
Om Datta, Saharanpur || 56

12) Globalization and its Impact of India
Dr.Nandkishor N. Dhondge || 62

13) THE ROLE OF ICT IN TEACHING SCIENCE AND HIGHER EDUCATION
Dr. Manju H. Pardeshi || 64

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

Scanned with CamScanner

14) Woman in 21 Century
Prof. Kanchan Ingole || 68

15) A STUDY OF CHANGING GLOBAL ENVIRONMENT
Jayshree. P. Morey || 70

16) INDIA IN THE GLOBAL ECONOMY
Dr. KISHOR M. GOMEKAR || 72

17) Globalization and Indian Agriculture
Mr. Miliand H.Dhale, Ghatanji || 76

18) GLOBAL ECONOMIC CRISIS AND ITS IMPACT ON INDIA
Tathagat P. Gajbhiye || 79

19) जागतिकीकरणाचा भारतीय ग्रामीण समाजावर पडलेला परिणाम
डॉ. अरविंद वि. जोशी, || 83

20) एकविसाव्या शतकतील स्त्री
DEEPA RUPLAL METKAR || 84

21) ग्रामीण स्त्रियांच्या आरोग्यविषयक समस्या
प्रा. डॉ. सरिता देशमुख || 86

22) जागतीकीकरणामध्ये भारतीय समाजातील स्त्रियांची बदलती स्थिती
डॉ. विशाखा जगन्नाथ डेरे, प्रा. किसन खाडे || 90

23) अंकीय (Digital) ग्रंथालयाची शैक्षणिक उपयुक्तता
डॉ. अल्फा के. जैन, दिग्रस || 94

24) ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील नविन प्रवाह
कु. शारदा लांजेकर, डॉ. अनिल भोयर, || 98

25) जागतीक पर्यावरणीय समस्या व कार्यरत आंतरराष्ट्रीय संस्था
RAVINDRA GOVINDRAO BAWANE || 102

26) "जागतिकीकरण आणि ग्रामीण स्त्री:ऐतिहासिक अध्ययन"
संदिप व्ही. भुरले || 104

27) भारतासंदर्भात जागतिकीकरणाचे गुण-दोष
डॉ. सुनिल श्री. केदार || 107

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

Scanned with CamScanner

५) ग्रामिण भागात देखील देशाच्या एकूण लोकसंख्येत स्त्री जन्माचे प्रमाण घटते आहे ते असेच घटत राहिले तर सामाजिक अभिसरणाला आपल्याला समोरे जावे लागेल. रूढी, परंपरा, चालिरिती बदलू शकतात.

६) ग्रामिण समाजात निवडीचे स्वांतत्र्य त्यांना मिळत नाही.

७) ग्रामिण भागात शिक्षणापासून दूर असलेल्या स्त्रियाकडे निर्णयक्षमता अजून आलेली नाही असल्यास ती दर्शविता येत नाही.

८) राजकीय पदांवर ती असली तरी त्या सेवेत अधिकार घरच्या पुरूष मंडळीचा असतो हे वास्तवही नाकारता येत नाही.

संदर्भ ग्रंथ —

१) शोध मराठीपणाचा, संपा, अरूणा ढेरे, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई फेबु २००९

२) विकास व पर्यावरणीय अर्थशास्त्र प्रा.डी. एस.निकम, निराली प्रकाशन

३)जागतिकीकरण आणि देशीवाद, रंगनाथ पठारे, लोकवाङ:मय गृह, पुनर्मुद्रण, मुंबई २००३

४) जागतिकीकरण आणि उच्च शिक्षण क्षेत्र, सुधीर पानसे, लोकवाडमय गृह मुंबई

५)WWW.research gate

❑❑❑

27

भारतासंदर्भात जागतिकीकरणाचे गुण-दोष

डॉ. सुनिल श्री. केदार,
सहयोगी प्राध्यापक,
संत गाडगे महाराज महाविद्यालय, बलगाव.

****

जुलै १९९१ रोजी भारताने नविन आर्थिक धोरण स्विकारले तेव्हापासूनच खऱ्या अर्थाने भारतात खाजगीकरण उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या धोरणास सुरुवात झाली. जागतिकीकरणातून बाजारधिष्ठित आर्थिक व्यवहारास प्रोत्साहन देऊन कार्यक्षमता वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येतो. सद्याच्या काळात दळणवळणाच्या सोयीमुळे जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात व्यापार, व्यवसाय, नोकरी करुन कोणत्याही वस्तू व सोवांचे उत्पादन करणे, खरेदी विक्री करणे शक्य झाले आहे.

जागतिकीकरणाचा अर्थ :

'जागतिकीकरण म्हणजे सर्व राष्ट्रांची एकच बाजारपेठ निर्माण करणे आणि त्या बाजारपेठेत जगातील साधनसामग्रीचे आणि भांडवलाचे सुलभ परिचलन निर्माण करणे होय.'

थोडक्यात अर्थव्यवस्थेच्या जागतिकीकरणाचा अर्थ व्यापक आहे. जागतिकीकरणातून भारतीय अर्थव्यवस्थेचा जगातील इतर राष्ट्रांशी सहज आर्थिक समन्वय साधण्याचा प्रयत्न होतो. जागतिकीकरणामुळे देशा देशातून उदार आर्थिक संबंध निर्माण होतात. त्यामुळे जगातील प्रत्येक राष्ट्राची व राष्ट्रातील उद्योगांची स्पर्धा वाढण्यास सुरुवात होते.

जागतिकीकरणाचे गुण :

१) तंत्रज्ञानाची देवाण -घेवाण :

जगातील नव्या उत्पादन पध्दतीमुळे नवीन उत्पादने, नवे तंत्र जगाच्या विविध भागात निर्माण होत आहेत. जागतिकीकरणामुळे नव्या तंत्रज्ञानाच्या हस्तांतरणाचा फायदा भारताला होऊ शकतो. म्हणजेच जागतिकीकरणाद्वारे तंत्रज्ञान विकसित होण्यास मदत होते.

२) विदेशी गंगाजळी आणि आंतरराष्ट्रीय व्यापार :

जागतिकीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला विदेशी गंगाजळे आणि आंतरराष्ट्रीय व्यापार संदर्भात अनेक फायदे झाले. जसे भारताच्या

Scanned with CamScanner

विदेशी गंगाजळे सुधारणा होणे, भारतावरील विश्वास वाढविण्यास मदत होणे, प्रामुख्याने विदेशी गुंतवणूकदार, विदेशी धनको, अनिवासी भारतीयांचा भारतावरील विश्वास वाढणे, भारताच्या निर्यातीत वाढ होण्याची शक्यता असते.

३) मोठे उत्पादन आणि उत्पादन क्षमतेचा पूर्ण वापर :

जागतिकीकरणात अर्थव्यवस्थेतील उत्पादन क्षमतेचा पूर्ण वापर आणि मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाच्या विविध बचतीच्या स्वरुपातील फायदे होतात. विविध उत्पादन क्षेत्रात उत्पादनाचे प्रमाण वाढल्याने किंवा उद्योगाच्या आकारमानात वाढ झाल्यामुळे विविध प्रकारच्या अंतर्गत बचतीचे फायदे अर्थव्यवस्थेला प्राप्त होतात. परिणाम स्वरुप उत्पादकता आणि उत्पादनात वाढ होण्यास मदत होते.

४) उत्पादन वितरण :

जागतिकीकरणामुळे राष्ट्रीय उत्पन्नाची विभागणी समाजातील विविध गटात करण्यात येते. त्यामुळे आर्थिक संरक्षणाचे धोरण राबविल्यास उत्पन्नाची विषम वाटणी होते. असा अनुभव आहे. म्हणून उत्पन्नाचे समान वितरणा करिता जागतिकीकरण आवश्यक आहे.

५) उच्च तंत्रज्ञ :

अर्थव्यवस्थेच्या जागतिकीकरणामुळे इतर देशातील चांगले कौशल्य असणारे किंवा कार्यक्षमता असणारे तंत्रज्ञ हे भारतात येतील. म्हणजेच इतर राष्ट्राच्या तुलनेत भारताची क्षमता वाढते.

जागतिकीकरणाचे दोष :

१) तीव्र स्पर्धा :

जागतिकीकरण म्हणजे बहुराष्ट्रीय कंपन्यांना भारतीय अर्थव्यवस्था खुली करणे होय. उच्च तंत्रज्ञान, उच्च व्यवस्था, प्रचंड भांडवल, कुशल श्रमीक इत्यादींमुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांसोबत भारतीय कंपन्या स्पर्धा करु शकणार नाही. परिणाम स्वरुप भारतीय उद्योगावर विपरित परिणाम होईल.

२) कामगारांचा विरोध :

भारतातील जास्तीत जास्त श्रमिक व त्यांच्या संघटना जागतिकीकरणाच्या विरोधात आहेत. जागतिकीकरणामुळे भांडवल प्रधानतंत्राचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. त्यामुळे बेकारी अधिक वाढते.

३) भारतासाठी जागतिकीकरण अयोग्य :

भारताची आर्थिक सामाजिक धार्मिक परिस्थिती पाहता भारतासाठी जागतिकीकरण अयोग्य आहे. नाणे निधी आणि जागतिक बँकानी केलेल्या शिफारशीमुळे विकसनशील भारताच्या आर्थिक समस्या सुटण्याऐवजी त्यामध्ये वाढ होण्याची अधिक शक्यता आहे. असे जागतिकीकरण विरोधकांचे मत आहे.

४) चैनीच्या उत्पादनात वाढ :

जागतिकीकरणामुळे विकसित राष्ट्रातील चंगळवादाचे वारे भारतात येण्याची शक्यता आहे. त्यामुळे चैनीच्या वस्तूंची मागणी वाढते. उपलब्ध साधन सामग्रीचा उपयोग, समाजाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या वस्तू उत्पादन करण्या ऐवजी श्रीमंताच्या गरजा भागविण्यासाठी केला जातो. त्याचा परिणाम म्हणून सुख सोयी, चैनीच्या वस्तूंच्या मोठ्या प्रमाणात वाढ होते.

५) मुलभूत सोयीकडे दुर्लक्ष :

भारतात रस्ते, पाणी, आरोग्य, शिक्षण, यासारख्या सोयीसुविधा आवश्यक आहेत. त्याशिवाय आर्थिक विकास शक्य नाही. जागतिकीकरणामुळे भारतात येणाऱ्या कंपन्या मुलभूत सोयीसुविधा निर्माण करण्याकडे दुर्लक्ष करतात.

निष्कर्ष :

भारतीय अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण केल्यास अनेक फायदे होतात परंतु त्यात काही धोकेही निर्माण होण्यास संभव आहे. यामध्ये योग्य समतोल राखला पाहिजे. जलद आर्थिक विकासाचा दर गाठण्यासाठी जगापासून अलिप्त व वेगळे राहणे. हे भारताला परवडणारे नाही. म्हणून भारताने पूर्ण ताकतीने जागतिकीकरणाच्या समोर गेलेच पाहिजे.

संदर्भ सूची :-

१) Indian Economy, Development & Environment Economics, Pimplapure & Co. Publication Nagpur.

२) Indian Economic Development - K. P. Sundharam and MaharaDatts. Chand Publication, New Delhi.

❑❑❑

Scanned with CamScanner

ISSN 2229-4406

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education for all Subjects

UNIVERSAL RESEARCH ANALYSIS

(Refereed & Peer Reviewed Research Journal)

Year - VII, Issue-XIV, Vol.-III | Impact Factor 3.18 (GRIFI) | Mar. 2017 To Aug. 2017

URA

EDITOR IN CHIEF

Dr. BALAJI KAMBLE

Scanned with CamScanner

INDEX

Sr. No.	Title of Research Paper	Author(s)	Page No.
1	Indian Economy Turnes The Corner	Dr. Baljeet K.Oberoi	1
2	Indian Financial Sector Commercial Banks	Dr. Rita T. Deshmukh	6
3	Insurance Sector: Challenges & Opportunities In India	Dileep D. Shahade	10
4	Development in Mathematics and Astronomy in Ancient India	Dr. Pradip P. Yeole	18
5	Yoga for Sports Performance	Anjali Barde	24
6	यशपाल के साहित्य में नारी शोषण	डॉ. संतोषकुमार गुंडाप्पा गाजले	31
7	जागतिकीकरण आणि भारतातील महिला सक्षमीकरण	डॉ. बालाजी ग्या. कांबळे	36
8	महाराष्ट्रातील वनांचे प्रकार : एक अभ्यास	डॉ. संतोष तु. कुटे, गजानन संतोषराव कुबडे	40
9	जाती अंताच्या लढाईतील फुले, शाहू, आंबेडकरांचे योगदान	श्री. श्रीराम शरदचंद्र साळुंके	46
10	संत तुकारामांचा पारंपारिक मानवतेच्या संकल्पनेचा नकार आणि बंडखोरीचा आवाज	माधुरी व्ही. भटकर	53
11	उदारमतवाद आणि नक्षलवाद - एक राजकीय विश्लेषण	डॉ. व्ही. एच. भटकर	59

Scanned with CamScanner

Issue : XIV, Vol . III
URA UNIVERSAL RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 3.18
ISSN 2229-4406
Mar. 2017 To Aug. 2017

10

संत तुकारामांचा पारंपारिक मानवतेच्या संकल्पनेची समिक्षा

माधुरी व्ही. भटकर
मराठी विभाग,
संत गाडगे महाराज महाविद्यालय,
वळगांव, जि. अमरावती (महाराष्ट्र) भारत

Research Paper - Marathi

गोषवारा

भारतीय साहित्य हे सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरांचे संमिश्र रसायन आहे. या पारंपारिक संकल्पनांपैकी एक महत्त्वाची संकल्पना म्हणजे मानवता होय. मानवता ही स्वातंत्र्य आणि समता या बुद्ध तत्त्वांवर आधारित आहे. संत साहित्य चळवळ ही नैसर्गिकरित्या मानवतेची मानवाकडून होणाऱ्या सातत्यपूर्ण मागणीसाठी मानवी हक्कांची जोपासना व्हावी या उद्देशासाठी प्रातिनिधीक स्वरूपाची आहे. कारण त्यातून अन्यायाची ताकद, समाजातील दूर्बल घटकांवर होणारा जुलूम, त्यांच्याविरोधात होणारी कटकारस्थाने या सर्व असामाजिक गोष्टींविरूद्ध जनसामान्यांचे प्रबोधन करणे हे संतसाहित्याचा उद्देश कोणाच्याही ध्यानात येईल एवढे ते सुलभ आहे. खरोखर पाहता १३ वे शतक म्हणजे भारतीय समाजातील जातीय व वर्ग व्यवस्थेविरूद्ध मानवी हक्कांचा कौल देणारे संत साहित्य निर्मितीचे शतक म्हणून गौरविले जाते यात अतिशयोक्ती मुळीच नाही. ही एक समाजसुधारणेची चळवळ आहे,ज्यामध्ये पद, कविता आणि अभंग रचनेचा पाया रोवला गेला. मराठी साहित्याद्वारे संतांनी समाजसुधारणा साधून चातुर्वर्ण्य व्यवस्थेचा नायनाट करण्याचे आवाहन पेललेले दिसते. समाजसुधारणेकरीता संतांनी अभंगरचनेद्वारे चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर प्रहार करण्याचे तंत्र योजले महाराष्ट्रामध्ये सामाजिक समतेचा पाया रोवण्याचे कार्य करण्यास ते सिद्ध झाले. त्या काळात संत तुकाराम, संत नामदेव, चोखा मेळा असे अनेक संत खेडूत शेतकरी, कामगार आणि स्त्रिया यांना एकत्रित करून त्यांच्या मध्ये बौद्धिक चर्चा घडवून आणत असत आणि त्यांच्या मनामध्ये सामाजिक

Scanned with CamScanner

विषमते विरूद्ध असंतोषाची ठिणगी पेटवत असत. दलित लोक आपल्या जीवनात आनंदी व्हावेत या करीता संत लोकांनी ब्राह्मण व इतर हिंदू पारंपारिक भूमिका करणारे लोक यांच्यात संघर्ष करणाऱ्या समाजाचे प्रतिनिधीत्त्व करण्याचे कार्य संत महात्म्यांनी केलेले दिसून येते. १३ व्या ते १७ व्या शतकापर्यंत संतांनी आपले साहित्य लिहून सामाजिक समतेच्या चळवळीची मुहूर्तमेढ रचली, त्यात संत तुकाराम महराजांनी बजावलेली भूमिका ही अत्यंत निर्णायक स्वरूपाची आहे. म्हणूनच 'ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळसं।' ही म्हण रूढ झालेली आहे. प्रस्तूत शोधनिबंधामध्ये संत तुकाराम महाराजांनी जे समाजाविषयी व्यापक व सखोल असे चिंतन केलेले आहे; त्यांनी अभंगाद्वारे समाजातील पाखंडी व दांभिक लोकांचा जो समाचार घेतलेला आहे; सर्व स्तरावरील अपप्रवृत्तींवर जे घणाघाती आघात केलेले आहेत त्याचे समर्पकरित्या विश्लेषण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

मुख्य संज्ञा: सामाजिक समता, सामाजिक विषमता, समाजसुधारणा, पद, कविता, अभंग, मानवता, भक्ती, भक्तीरस, संत इत्यादी.

पारलौकिकतेची झेप आणि वास्तविकतेचे भान:

श्री रा. चि. ढेरे सांगतात "संत तुकाराम महाराज हे आपल्या अभंगातून पारलैकिक तत्त्वज्ञानाचा पुरस्कार केलेला दिसतो परंतु आपण सर्वजण लौकिक जगात वावरत असून येथील सत्य काय आहे याचे त्यांना संपूर्ण भान होते."(रा. चिं. ढेरे (१९९८): संत, लोक आणि अभिजन; पद्मगंधा प्रकाशन, एरंडवणा, पुणे. पृष्ठ १६) ते म्हणतात, 'कासया उदास असों देहावरी' म्हणजे जीवनात कितीही दु:ख असले तरी मनात स्मशानासम वैराग्य आणू नये; तर आपला देह चंदनाप्रमाणे लोककल्याणासाठी झिजवावा. 'जोडोनिया धन उत्तम वेव्हारें, उदास विचारे वेंच करी.' असा संदेश अजरामर आहे.

संत तुकाराम सांगतात,

आम्ही वैकुंठवासी। आलों याचि कारणांसी
बालिले जे ऋषी। साच भावें वर्तीया।।१।।
झाडू संतांचे मारग। आडरानें भरले जग।
उच्छिष्टाचा भाग। शेष उरला तो सेवूं।।२।।
अर्थ लोपली पुराणें। नाश केला शब्दाज्ञनें।
विषयलोभी मनें। साधन हें बुडविलें।।३।।
पिटूं भक्तीचा डोंगोरा। कळिकाळासी दरारा।
तुका म्हणे करा। जयजयकार आनंद।।४।।

वरील शब्द 'झाडू संतांचे मारग' या अभंगातील आहेत. यामध्ये संत तुकारामांनी आपण पारलौकिकदृष्ट्या कोण आहोत हे स्पष्ट केले आहे. श्री. डॉ. हे. वि. इनामदार यांनी या अभंगाचे विश्लेषण अतिशय सार्थपणे केलेले आहे. ते म्हणतात, "खरे सांगायचे तर आम्ही मुळचे वैकुंठवासी आहोत. वैकुंठात

Scanned with CamScanner

श्रीविष्णूच्या सहवासात आमचा सहवासात निवास असतो; पण एक विशिष्ट कारण म्हणजे उद्दिष्ट मनात धरून आम्ही पृथ्वीतलावर जन्म घेतला आहे. फार पुर्वी. ऋषीमुनींनी जो विचार सांगितला होता, तोच विचार खऱ्या स्वरूपात लोकांना सांगावा व त्याप्रमाणे वागण्याचे आवाहन त्यांना करावे, म्हणून आम्ही पृथ्वीवर जन्म घेतला आहे. साधुसंतांचे मार्ग झाडून आम्ही ते मार्ग स्वच्छ करू. हे जग आडरानाच्या विकट वाटेने चालले आहे. आम्ही साधू जनांच्या उष्ट्या भागांचे सेवन करू. सद्विचार लोकांना समजावून सांगितल्यावर ते नीट मार्गावर येतील. संतांच्या संदेशांचे आम्हीही पालन करू. आपल्या पुराणग्रंथातील मूळ अर्थ लोप पावला आहे. त्यातील विचारांचे मर्म लोक विसरले आहेत. वरवरच्या शाब्दिक ज्ञानाच्या आहारी गेल्यामुळे विनाश ओढवला गेला आहे. लोकांच्या मनात विषयवासना वाढली आहे. त्या लोभापायी आत्मकल्याणाची सगळी साधने लुप्त झाली आहेत. अशी सगळी परिस्थिती आहे. ती सुधारण्यासाठी आम्ही भक्तिमार्गाचा डिडिंब घुमवूं. भक्तिपंथांचा विचार करू. त्या डिंडिबाचा आवाज ऐकून प्रत्यक्ष यमराजालाही धाक वाटेल. बांधव हो! चला उठा! श्रीहरीच्या नामाचा जयघोष आनंदाने करा." (डॉ. हे. वि. इनामदार (२००१): संत–संकीर्तन; प्रतिमा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, पृष्ठ १२०.)

या अभंगातून तुकाराम महाराजांचा आत्मविश्वास प्रभावीपणे व्यक्त झाला आहे. आपण या लौकिक जगात परमेश्वराच्या सहवासातून आलो असून आपल्या जीवनाचे नेमके धेय्य काय आहे हे आपणाला शोधले पाहिजे. वास्तविक जीवनाचे भान ठेवूनच पारलौकिक जीवनाचा आपण आनंद घेऊ शकतो.

संत साहित्याचा उद्देश – समाजसेवा हीच ईश्वरसेवा:

समाजसेवेतून ईश्वराची प्राप्ती होऊ शकते, किंबहुणा जे जे दु:खी आहेत, संसारातील संकटांनी ग्रस्त झालेले आहेत त्यांना मानवतेच्या भावनेतून जवळ करावे म्हणजे ईश्वर संतुष्ट होईल असे संत तुकारामांना वाटते. ते म्हणतात,

जे का रंजले गांजले। त्यांसी म्हणे जो आपुले।।१।।
तोचि साधु ओळखावा। देव तेथेचि जाणावा।।२।।
मृदु सबाह्य नवनीत। तैसें सज्जनांचें चित्त।।३।।
ज्यासि आपंगिता नाहीं। त्यासि धरी जो हृदयीं।।४।।
दया करणें जे पुत्रासी। तेचि दासा आणि दासी।।५।।
तुका म्हणे सांगू किती। त्याचि भगवंताच्या मूर्ती।।६।।

वरील ओळी या 'देव तेथेंचि जाणावा' या तुकाराम महराजांच्या अभंगातील आहेत. हा अभंग वारकरी संप्रदायातील मंडळीत अतिशय लोकप्रिय आहे. संत तुकारामांनी या अभंगात समाजाविषयी दया, करूणा आणि आपलेपणा अर्थात प्रेम हे तत्त्वविचार अतिशय प्रभावीपणे मांडतात. श्री डॉ. हे. वि. इनामदार या अभंगाचे विश्लेषण करतांना लिहितात, "जे बांधव संसारातील आपत्तींनी रंजलेले व गांजलेले आहेत, त्रासून गेलेले आहेत, त्या बांधवांना जो माणूस आपलेपणाने जवळ करतो, तोच माणूस खरा साधू आहे, असे

Scanned with CamScanner

समजावे. एवढेच नव्हे, तर प्रत्यक्ष देव त्याच्या ठिकाणी आहे, असे मानावे. नवनीत म्हणजे लोणी सबाह्य मृदु असते. आतून आणि बाहेरूनही लोणी मऊच असते. साधुजनांचे मन लोण्यासारखे अंतर्बाह्य मृदु असते. ज्या माणसाला कुणीही आपंगिता, म्हणजे मायेने सांभाळणारा नसतो, त्या माणसाला सज्जन आपल्या पोटाशी धरून आधार देतो. जो कोणी स्वत:च्या मुलावर जशी माया करतो, तशीच माया दास आणि दासी यांच्यावरही करत असेल, तर तो खरा साधू आहे म्हणून ओळखावे. अशा सज्जनाबद्दल आणखी किती सांगावे? तो प्रत्यक्ष परमेश्वराचीच मूर्ती आहे, असे समजावे." (डॉ. हे. वि. इनामदार (२००१): संत–संकीर्तन; प्रतिमा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, पृष्ठ १२२ – १२३.)

यावरून हे स्पष्ट होते की तथागत बुद्धाच्या संदेशाप्रमाणे जे जे दीनदुबळे आहेत, रंजलेले किंवा गांजलेले आहेत, संसारातील संकटांनी ग्रासलेले आहेत अशा समाज घटकांना उदार अंत:करणाने किंवा मोठ्या मनाने जवळ करावे, त्यांच्यावर प्रेम करावे असा उदात्त संदेश संत तुकारामांनी या अभंगातून दिलेला आहे. जनसेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे असे संत तुकाराम महाराजांनी या अभंगाद्वारे पटवून दिलेले आहे.

तसेच संत तुकारामांचे भूतदयेचे नीतीशास्त्र हे देखील रोखठोक आहे. ते म्हणतात, "दया तिचें नांव पाळण। आणिक निर्दाळण कंटकांचे।।" श्री यु. म. पठाण सांगतात, "कुणावर कृपा करावी आणि कुणावर प्रहार करावेत, याचे गणित तुकारामांच्या मनात पक्के आहे. दया या गुणाविषयी तुकारामांच्या मनात निश्चित कल्पना आहे. जिच्यामुळे प्राणीमात्राचे पालन–पोषण होते आणि कंटकांचा म्हणजेच दुर्जनांचा नायनाट होतो." (डॉ. यशवंत सोनुने (२०१०): डॉ. यु. पठाण यांचे संतसाहित्य चिंतन, चिन्मय प्रकाशन पृ. ४०)

सामाजिक विषमतेवर प्रहार:

संत तुकारामांनी 'भेदाभेद भ्रम अमंगळ' या अभंगामध्ये विषमता संगाणारा धर्म कसा अमंगळ आहे हे सांगितले आहे. संत तुकाराम या अभंगात सांगतात,

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म।
भेदाभेद धर्म अमंगळ।।१।।
आइका जी तुम्ही भक्त भागवत।
कराल तें हित सत्य करा।।२।।
कोणाही जीवाचा न घडो मत्सर।
वर्म सर्वेश्वरपूजनाचें।।३।।
तुका म्हणे एका देहाचे अवयव।
सुखदु:ख जीव भोगे पावे।।४।।

संत ज्ञानदेश्वरांनी पसायदानात 'आता विश्वात्मके देवे' असे म्हणून विश्वव्यापी परमेश्वराला आवाहन केले आहे. त्यांची ती प्रार्थना ऐकून 'विश्वेशरावो' संतुष्ट झाला आणि त्यामुळे ज्ञानदेवे सुखीया जाहला असे संत ज्ञानेश्वरांना सांगावयाचे आहे. त्याच प्रमाणे संत तुकारामांनाही समस्त जगात एकच ईश्वर भरभरून उरला

Scanned with CamScanner

आहे असे सूचवावयाचे आहे. श्री. डॉ. हे वि इनामदार वरील अभंगाचे विश्लेषण असे करतात, "सर्व जग विष्णुमय आहे, एकच परमतत्त्व जगात सगळीकडे भरून राहिले आहे, असे समजणे हा वैष्णवांचा धर्म आहे. परमेश्वर सर्वव्यापी आहे, असा विष्णुभक्तांचा मनोमन विश्वास आहे. देव आणि भक्त यांच्यात द्वैत मानणे किंवा प्राणीमात्रांविषयी दुजाभाव बाळगणे हे चांगले नव्हे. बांधव हो! तुम्ही भगवंताचे खरे उपासक आहा. सत्याचे स्वरूप समजून घ्या. तुम्ही जी कोणतीही कृती कराल ती हितकारक असली तरच करा. कुणाही जीवाचा मत्सर करू नका. सर्वत्र एकच परमतत्त्व भरून राहिले आहे. त्या सर्वेश्वर परमात्म्याच्या पूजनाचे हेच रहस्य आहे, ते तुम्ही लक्षात ठेवा. एकाच शरीराचे विविध अवयव असतात, त्यापैकी एखाद्या अवयवाला सुखाची संवेदना किंवा दु:खाची टोचणी झाली तर ती त्या जीवाला सारखीच जाणवते." (डॉ. हे. वि. इनामदार (२००१): संत–संकीर्तन; प्रतिमा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, पृष्ठ १२८.) या वरून स्पष्टपणे सांगता येईल की संत तुकाराम महाराजांचा धर्मक्षेत्रातील समतेचा संदेश सदरील अभंगातून अतिशय प्रभावीपणे मांडलेला आहे. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी, आणि सर्व प्राणीमात्रांच्या ठायी ईश्वराचा अंश असून लहान–मोठा, सुष्ट–दुष्ट, पापी–पुण्यवान, श्रेष्ठ–कनिष्ठ असा भेदभाव करू नये आणि कुणाचाही हेवा–दावा किंवा मत्सर करू नये. भेदभावी नजरेने कुणाकडेही पाहणे हे अमंगल कृत्य आहे. ईश्वराच्या दृष्टिने सगळे प्राणीमात्र समसामान आहेत. हा अतिशय मोलाचा विचार संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगातून मांडलेला आहे.

निष्कर्ष :

१. १३ व्या ते १७ व्या शतकापर्यंत संतांनी आपले साहित्य लिहून सामाजिक समतेच्या चळवळीची मुहूर्तमेढ रचली, त्यात संत तुकाराम महराजांनी बजावलेली भूमिका ही अत्यंत निर्णायक स्वरूपाची आहे. म्हणूनच 'ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळसं।' ही म्हण रूढ झालेली आहे.

२. आपण या लौकिक जगात परमेश्वराच्या सहवासातून आलो असून आपल्या जीवनाचे नेमके धेय्य काय आहे हे आपणाला शोधले पाहिजे. वास्तविक जीवनाचे भान ठेवूनच पारलौकिक जीवनाचा आपण आनंद घेऊ शकतो.

३. तथागत बुद्धाच्या संदेशाप्रमाणे जे जे दीनदुबळे आहेत, रंजलेले किंवा गांजलेले आहेत, संसारातील संकटांनी ग्रासलेले आहेत अशा समाज घटकांना उदार अंत:करणाने किंवा मोठ्या मनाने जवळ करावे, त्यांच्यावर प्रेम करावे असा उदात्त संदेश संत तुकारामांनी देव तेथेंचि जाणावा' या अभंगातून दिलेला आहे. जनसेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे असे संत तुकाराम महाराजांनी या अभंगाद्वारे पटवून दिलेले आहे.

४. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी, आणि सर्व प्राणीमात्रांच्या ठायी ईश्वराचा अंश असून लहान–मोठा, सुष्ट–दुष्ट, पापी–पुण्यवान, श्रेष्ठ–कनिष्ठ असा भेदभाव करू नये आणि कुणाचाही हेवा–दावा किंवा मत्सर करू नये. भेदभावी नजरेने कुणाकडेही पाहणे हे अमंगल कृत्य आहे.

Scanned with CamScanner

ISSN 2231-6671

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

Hi-TECH RESEARCH ANALYSIS

(UGC Approved Peer Reviewed Research Journal)

Year - VIII, Issue - XV, Vol.- I

Impact Factor 3.92
(GRIFI)

Feb. 2018 To July 2018

EDITOR IN CHIEF

DR. BALAJI KAMBLE

Scanned with CamScanner

Issue : XV, Vol. I
Hi-TECH RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 4.25
ISSN 2231- 6671
Feb. 2018 To July 2018

INDEX

Sr. No	Title for Research Paper	Page No
1	Kinetics And Mechanism of Iridium (III) Catalysed Oxidation Of 3-Amino-1- Propanol by Cerium (IV) in Aqueous Sulphuric Acid Medium **D. C. Pawar**	1
2	Current Status of India's Foreign Direct Investment **Dr. Arun P. Chandurkar**	7
3	India : Strategic Challenges and Responses **Dr. Laxman P. Wagh**	16
4	Assessment of Carbon Monoxide at Traffic Signals,Toll Plazas and in Main Roadside Built Houses and Impact of its Chronic Exposure on Public Health **Dr. Umakant P. Kamble**	30
5	भारत में स्वयं सहायत्ता समूह कि स्थिती एवं भूमिका **डॉ. सुनिता ज्ञानेश्वर सावरकर**	36
6	लिंगायत स्वतंत्र धर्म मागणी आंदोलने आणि आर्थिक समस्या **बालाजी वसंतराव चिलर्गे**	45
7	मराठी आख्यायिका : स्वरूप आणि संकल्पना **डॉ. माधुरी विनायक भटकर**	52
8	माहिती तंत्रज्ञान युगात तणावमुक्तीसाठी पायी चालणे सर्वोत्तम उपाय **डॉ. बी. एम. सावरकर**	57
9	यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय विचार व कार्य **डॉ. विनायक एच. भटकर**	61

Scanned with CamScanner

7

मराठी आख्यायिका : स्वरूप आणि संकल्पना

डॉ. माधुरी विनायक भटकर
मराठी विभाग,
संत गाडगे महाराज महाविद्यालय,
वलगांव, जि. अमरावती (महाराष्ट्र) भारत

Research Paper - Marathi

प्रस्तावना :-

आजच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात मानवाने भौतिक व औद्योगिक प्रगती मोठया प्रमाणात केली आहे. त्याच बरोबर पौराणिक व ऐतिहासिक काळापासून चालत आलेल्या मौखिक परंपरेतील लौकीक व अलौकीक गोष्टींना सामाजिकदृष्टया अनन्यसाधारण महत्व आहे. लोकसंस्कृतीतून चालत आलेले सण-वार व उत्सव तसेच विधींना भावनिक आधार होता, पण आज सण-उत्सवांचे स्वरूप फक्त देखाव्या पुरतेच मर्यादित राहीले आहे. या गोष्टींना जे सामाजिक, धार्मिक अलौकिकत्व होते ते आज अभावाने क्वचीतच पाहावयास मिळते. लोकसंस्कृती, ग्रामसंस्कृती, रूढी परंपरा, लोकविश्वास, दंतकथा, आख्यायिकांवद्दल लोकमानसात आस्था राहिली नाही. त्यामुळे माणसाच्या जागण्यात हा खरा सूर हरवून गेला आहे. काळानुकाळांपासून अशिक्षितांनी जतन करुन ठेवलेल्या, रुढी-कल्पना, लोककथा व विविध दंतकथा हयांना थोतांड म्हणता येणार नाही. कारण ऐतिहासिक साहित्याच्या उत्खननात लोकसाहित्याची ही सामग्री पुरक ठरली आहे. पुरातत्व खात्याने लोकसाहित्याच्या या सामग्रीच्या आधारे ऐतिहासिक सत्य उघड करुन दाखविले आहे.

मराठी आख्यायिका व परंपरा :-

लोककथा, लोकगीते, लोकसंस्कृती, लोकला, रूढी, प्रथा, परंपरा, लोकभ्रम, विधी, सण-वार, उत्सव आदींचा अंतर्भव लोकसाहित्याच्या अभ्यासात होत असतो. प्रस्तुत शोधनिबंध हा मराठी आख्यायिका स्वरूप आणि संकल्पना अशा स्वरूपाचा असल्यामुळे आख्यायिका, दंतकथा व

Scanned with CamScanner

लोककथा या विषयी चर्चा करण्याआधी लोकसंस्कृती व धर्मप्रधानता या संबंधी थोडेसे जाणून घेणे महत्वाचे वाटते.

धर्मप्रधानता हे लोकसंस्कृतीचे ठळक वैशिष्टये आहे. आज बदलत्या परिस्थितीतही लोकसंस्कृतीचे धार्मिक स्वरूप पुष्कळ प्रमाणात टिकून आहे. याचे राजकीय अंग पूर्वी ग्रामसंस्कृतीपुरते मर्यादित होते आणि आर्थिक अंग बलुतेदारीने युक्त होते. लोकसंस्कृतीच्या सर्वच क्षेत्रात धर्माचा दंडक दिसून येतो. उदा. देव-देवता, त्यांच्या उपासना विधी, कुलधर्म-कुलाचार, सण-व्रते-उत्सव, यात्रा, संस्कारविधी, कला, क्रिडा साहित्य, कौटुंबिक व सामाजिक संबंधीविषयीचे संकेत इ.सर्व बाबतीत धर्मकल्पनांचे प्राबल्य आढळते.

लोकसंस्कृतीत ऋतुचक्राबरोबरच रंग-रूप बदलणाऱ्या निसर्गाच्या स्वागतासाठी बाराही महिने काही ना काही सणाव्रतांची योजना आखलेली असते. भारत देश हा कृषिप्रधान असल्यामुळे निसर्गाशी नाते जोडणाऱ्या सण - उत्सवांचे प्रस्थ आपल्याकडे विशेष आहे. या सर्वच सणा-उत्सवांत लोकमानसाची अभिव्यक्ती अनेक प्रकारे होत असते. लोकसंस्कृतीचा विकास हा धर्मपरंपरातून झालेला असल्याने संबंध लोकजीवनात महत्वाचे स्थान असलेल्या देव-देवता, त्यांचे उपासक उपासना पध्दती, लोकधारणा, लोकाचार, दंतकथा, आख्यायिका इत्यादींचा परिचय करून घेण्यासाठी लोकसंस्कृतीचे स्वरूप समजून घेणे आवश्यक ठरते. विशेषत: मराठी लोकसंस्कृतीबाबत एक वेगळेपणही इथे नोंदविले पाहिजे. डॉ.ढेरे यांच्या मताप्रमाणे 'आपली मराठी लोकसंस्कृती ही भारतीय लोकसंस्कृतीचाच एक प्रादेशिक आविष्कार आहे.' परंतु महाराष्ट्र हा दक्षिणेस द्रविड संस्कृतीच्या जवळ असल्यामुळे इथल्या सांस्कृतिक इतिहासात आर्य-द्रविड संस्कृतीचा संगम स्पष्टपणे जाणवतो. दुसरे वेगळेपण असे की, मराठी लोकसंस्कृतीवर भागवत धर्माचा - मराठी संतपरंपरेच्या उपदेशाचा प्रभाव विशेष जाणवतो. भागवत धर्माच्या प्रभावामुळे मराठी लोकसंस्कृतीचे स्वरूप पुष्कळच सौम्य-सात्विक बनले आहे. इथल्या लोककथा, दंतकथा व आख्यायिका या पौराणिक ऐतिहासिक व संतपरेपरेच्या अवती-भवती विशेष करून एकवटलेली दिसतात.

वर्गीकरण :-

लोकसाहित्याच्या अभ्यासकांनी आशयाच्या दृष्टीने दंतकथा किंवा आख्यायिकांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केलेले आहे.

आख्यायिका / दंतकथा

स्पष्टीकरणात्मक आख्यायिका (व्युत्पत्तीकथा)	ऐतिहासिक आणि सांस्कृतिक इतिहासा संबंधीच्या आख्यायिका	पौराणिक स्वरूपाच्या माहात्म्यकथा	धर्मश्रध्देतून निर्माण झालेल्या दंतकथा

Scanned with CamScanner

वरील वर्गीकरणावरून हे लक्षात येते की, बहुतांश आख्यायिका किंवा दंतकथांच्या मुळाशी स्थळ, काळ, व्यक्ती, वास्तूच असतात. शतकानुशतकाच्या तिच्या मौखिक प्रवासात तिच्या भोवती कल्पनेचे वलय अधिक असल्यामुळे त्यातील सत्य धुसर झाल्याचे दिसते. परंतु त्या सत्यांशाला श्रध्देची जोड मिळाल्यामुळे त्यांना अलौकिकत्व प्राप्त होते.

आख्यायिकासंदर्भात प्राचीन ग्रंथातील संदर्भ :

'आख्यायिका' हा शब्द प्रारंभीच्या वैदिक वांङ्:मयात सापडत नसला तरी 'तैत्तरीय आरण्यकात' हा शब्द आलेला आहे. पतंजलीने आख्याने आणि आख्यायिका असे दोन शब्द कथासाहित्यासाठी वापरले असून यवक्रीत, प्रियंगु व ययाति ही आख्यानाची आणि वासवदत्ता व यमुनोत्तरा ही आख्यायिकेची म्हणून उदाहरणे दिली आहेत. पण पतंजलीने आख्यान आणि आख्यायिकेची लक्षणे मात्र सांगीतली नाहीत. 'आख्यान' व 'आख्यायिका' यांतला पतंजलीने दिलेल्या उदाहरणावरून जो भेद सूचित होतो तो असा, 'आख्याने म्हणजे अतिपुरान व पूज्यकथा' आख्यायिका म्हणजे लौकिकथा, विशेषत: ऐतिहासिक दंतकथा जो की, अशा कथांत दिव्यांश नाही.

कात्यायन हा आख्यायिकांवर लिहिणारा सर्वात प्राचीन लेखक आहे असे मत डॉ. अनुराधा कुलकर्णी यांनी व्यक्त केले आहे. कात्यायनाच्या मते, आख्यायिका या महाभारतासारखा महाकाव्यातून येतात, पण त्या स्वतंत्र असून प्रसंगोपात्त त्यांचे आगमन होते. त्याचबरोबरच 'अग्निपुराणा' मध्ये कथेचे प्रकार सांगीतले असून त्यात 'आख्यायिका' हा कथेचा प्रकार मानलेला आहे.

आख्यायिका कथाखंड कथा परिकथा तथा ।
कथानिकतेची मन्यन्ते गद्यकाव्येन पंचधा ॥ (अग्निपुराण १-१२)

'आख्यायिका', 'खंडकथा', 'कथा', 'परिकथा' व 'कथानिका' हे गद्यकाव्याचे पाच प्रकार होत. अग्निपुराणतच आख्यायिकेची व्याख्या करताना म्हटले आहे. "राजवंशाची गद्य पद्य रूप प्रशंसा, तसेच कन्याहरण, रणसंग्राम इ.उच्छवास - परिच्छेद यांनी विभागून सांगणे म्हणजे आख्यायिका होय."

भारताने 'बन्हनृता स्तोकसत्वा' म्हणजे पुष्कळशी खोटी असलेली कथा, म्हणजे आख्यायिका असे म्हटले आहे. भामहाने मात्र कथेपासून आख्यायिकेला वेगळे मानताना कथा ही 'कल्पितप्रधान' असते व आख्यायिका ही 'ऐतिहृतप्रधान' म्हणजे सत्यघटितांवर आधारलेली असते असे म्हटले आहे. अमरसिंहाने 'अमरकोशात' दोन्हीतील फरक सांगतांना कथा हया काल्पनिक व आख्यायिका ऐतिहासिक घटनांचे वहन करीत असतात असे सांगीतले आहे.

मराठी आख्यायिकांचे स्वरूप :

'आख्यायिका' या मराठी शब्दाला इंग्रजीत (Legend) असे म्हणतात. यालाच दंतकथा असेही म्हणतात. फ्रेशर या अभ्यासकाने 'खोटा इतिहास म्हणजे आख्यायिका' अशी आख्यायिकेची

Scanned with CamScanner

व्याख्या केली आहे. याचाच अर्थ आख्यायिकेत कोणती तरी एखादी ऐतिहासिक घटना दडलेली असते. तिच्या मुळांशी अल्पसा का होईना सत्यांश असतो. परंतु ही घटना कल्पनावगुंठीत असल्यामुळे तिची सत्यता सहजपणे उकलता येत नाही. अशा काही अलौकिक व्यक्ती, वास्तू, स्थळ ऐतिहासिक घटना यांच्या संदर्भात लोकमनात अनेक आख्यायिका आहेत. आख्यायिकांचे प्रचलन मौखिकरित्या होत असून त्यांची निर्मिती कोणत्या काळातील आहे हे निश्चित सांगता येत नाही. तसेच त्यांचा कर्ता अनामिक असतो. पुरलेल्या धनासंबंधी किंवा जुनाट डोंगराबाबत तसेच प्राचीन मंदिरा बाबतच्या अनेक आख्यायिका आपल्याला आजही ऐकायला मिळतात. पुराणग्रंथामध्ये हया कथा अधिक सापडतात. संतांची चरित्रे तर आख्यायिकांनी ठासून भरलेली दिसतात. त्या पाठीमागे एखादेवळी ऐतिहासिक सत्य असेल कदाचित नसेलही परंतू त्या लोकमनातील श्रध्देतून जन्माला आलेल्या आहेत. याच श्रध्देपोटी लोकप्रतिभेतून लौकीकाचे अलौकिकरण व अलौकिकाचे लौकीकरण चालू असते.

थोडक्यात आख्यायिकांची निर्मिती ही लोकरंजन व उद्‌बोधन यासाठी झालेली नसून ती त्याव्दारे पारंपारिक कल्पनावगुंठीत लोकस्मृती जागविल्या जातात. विशिष्ट व्यक्ती वास्तू, स्थळाविषयीच्या गुढ आकर्षणातून लोकप्रतिभेतून आख्यायिका साकारत असतात. त्यांचा रचनाबंध नेमका कसा आहे ते सांगता येत नाही पण त्या आख्यायिका किंवा दंतकथेतील वर्णनावरून तिच्या स्वरुपाची कल्पना येते.

'तैत्तरीय आरण्यकात' आख्यायिकांचा उल्लेख सापडतो. यावरून त्यांची प्राचीनता आपल्या लक्षात येते डॉ. अनुराधा कुलकर्णी यांच्या मते 'कात्यायन' हा आख्यायिकांवर लिहिणारा पहिला प्राचीन लेखक आहे. तसेच 'अग्निपुरणा' मध्येही आख्यायिकेचा उल्लेख सापडतो. आख्यायिकेतील घटना हया ऐतिहासिक असून त्या काल्पनिक असतात. त्यांचे मुळ सत्यसृष्टीत असते.

आख्यायिका व दंतकथा :

मनुष्याच्या सांस्कृतिक इतिहासात, प्राचीन काळापासून ते आजपर्यंत कथा हा मानवाचा नैसर्गिक मित्र, सोबत बनली आहे. कथाप्रियतेला कोणत्याही प्रकारचे बंधन नसते. मुळात मनुष्य स्वभावात अपार कुतूहल भरले आहे. कुतूहलापोटीच मानव प्राण्याच्या आवतीभोवती दिसणारे अनेक चमत्कार, वैचित्र्यपूर्ण दृश्य, भिन्नस्वभावी व्यक्ती व प्राणी, विविध वस्तु व घटना यांच्याबद्दलचे कुतूहल माणसाच्या मनात सतत जागृत असते आणि या अनुषंगानेच तो अनेक प्रकारच्या प्रश्नांची उत्तरे शोधीत राहतो. या विविध प्रश्नोत्तरातून सतत कथा निर्माण होत गेल्या आणि आजपर्यंत त्या अव्याहतपणे चालूच आहेत.

दंतकथा व आख्यायिका हे लोककथांचे वैशिष्टयेपूर्ण प्रकार असून प्रदेशविष्टतेच्या दृष्टीने त्यांना विशेष महत्व दयावे लागते. 'सत्याधार' हा या कथा प्रकारांचा विशेष आधार असून ते

Scanned with CamScanner

'लोकस्मृतीचे वाहक' म्हणून संबोधले जातात. प्रादेशिक वैशिष्ट्यांवरोवरच तेथील धार्मिक, सामाजिक, स्थानिक, ऐतिहासिक, गांव व्यक्ति आणि वातावरणाचे सम्मक दर्शनही त्यातून होत असते.

दंतकथा किंवा आख्यायिकांची निर्मिती ही लोकसमूहाच्या भ्रमातून अथवा अभ्यासदृष्टीतून होत असते. कारण लोकसमूहाचा दैवीशक्तीवर किंवा अलौकिक घटनांवर प्रचंड विश्वास असतो. या दैवीशक्तीमुळे लौकिक जगातील वस्तूंवर व घटनांवर विलक्षण परिणाम होतो अशी लोकांची समजूत असते. त्यातून चमत्कारासंबंधीच्या कल्पना निर्माण होतात. त्याचप्रमाणे पौराणिक व ऐतिहासिक व्यक्तिंच्या पराक्रमासंबंधीच्या कथा त्याच्या कुतूहलातून उगम पावतात. यातुनच दंतकथा, आख्यायिका जन्माला येतात. लोकप्रतीभा ही या कथांची जननी असते.

मराठीमध्ये दंतकथेला असत्यकथा, भाकडकथा, अशा अर्थान संबोधले जात असले तरी 'दंतकथा' ही संज्ञा प्रचलित आहे. लोकजीवनात मौखिक परंपरेने चालत आलेली अशी कथा जिचा आधार एखादी ऐतिहासिक घटना असते. परंतु मौखिक परंपरेमध्ये या कथाप्रकाराचे स्वरूप काही प्रमाणात बदललेले असते. तिला दंतकथा किंवा आख्यायिका असे म्हणतात.

सारांश,

दंतकथा, आख्यायिका यांच्यामध्ये सुक्ष्म असा फरक जाणवतो. दंतकथा व सर्वश्रुत व व्यापक स्वरूपाच्या असून ते प्रदेशसिमा ओलांडल्याचेही दिसून येते. आख्यायिका हया सिमित प्रदेशापुरत्या मर्यादित असतात आणि त्यांचे जेंव्हा लोकसमूहात विस्तार होतो तेंव्हा त्या दंतकथा म्हणून नावारूपाला येतात. दंतकथा किंवा आख्यायिका या लोकप्रतिभेतून मौखिक परंपरेने चालत आलेली असून त्यांना श्रध्दायुक्त आधार असतो आणि त्याचा प्रभाव वर्तमान पिढीवर पडत असतो.

लोकसाहित्याच्या अभ्यासकांनी आजवर लोकसाहित्याचे प्रदेशनिहाय संकलन केले असून ते काही प्रमाणात वरवरचे संकलन झाले आहे. लोकसाहित्याच्या तळाशी जाऊन डोळसपणे संशोधन व अभ्यास करण्याची आज गरज आहे.

संदर्भ सूची :-

१) मराठी विश्वकोश खंड - २
२) लोकसाहित्याची रूपरेखा - दुर्गाबाई भागवत
३) लोकसाहित्याची अंत:प्रवाह - प्रभाकर मांडे
४) लोकसाहित्याचे स्वरूप - प्रभाकर मांडे
५) लोकसाहित्य मीमांसा - डॉ.विश्वनाथ शिंदे
६) मराठी लोककथा स्वरूप मीमांसा - सौ.वैदेही कोळेकर
७) लोकमत - स.रा.गाडगीळ)

Scanned with CamScanner